**महावितरण**

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/७३१ दिनांक : ०८.०१.२०१५

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनीतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि. ०१ जानेवारी २०१५ पासून सुरु करणेबाबत.

**************

सर्वसाधारण आदेश क्र. २० (क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांकरिता अस्तित्वात असलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना, कर्मचारी कामावर असताना अपघात झाल्यास कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना व म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमार्फत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक मदत योजना अंतर्गत वैद्यकीय सुविधा, प्रतिपूर्ती व आर्थिक मदत देण्यात येते. या व्यतिरिक्त कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना गटविमा योजने अतंर्गत रु. २ लाखापर्यंत अपघात विमा योजना कंपनीमार्फत देण्यात येतो.

म.रा.वि.मं. सुत्रंधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनर्निधारण करारातील मुद्दा क्र. ८ नुसार MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. याबाबत तिन्ही कंपन्यांतील कामगार संघटना प्रतिनिधीं सोबत वेळोवेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने म.रा.वि.मं. सुत्रंधारी कंपनी मर्यादित अंतर्गत तिन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांनी तिन्ही कंपन्यांच्या संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मासं) यांच्यांशी विचारविनियम करुन तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याबाबतचा करार दि. २३.१२.२०१४ रोजी करण्यात आला. त्यानुषंगाने संचालक मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी मंडळ ठराव दि. ०१.०१.२०१५ नुसार "MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy" सुरु करण्यासाठी मंजूरी दिली आहे.

त्यानुसार ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे यांच्याशी कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी "MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy" व **फक्त कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी** "कर्मचारी अपघात विमा योजना" बाबत करार करण्यात आला आहे.

## MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy

**MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy ची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

१) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** चा संदर्भ क्र. **१६३६००/४८/२०१५/२१६२** असा आहे.

२) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** चा दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१५ चा वार्षिक हप्ता संपूर्णपणे कंपनीतर्फे भरण्यात आला आहे.

३) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** चा कालावधी दि. ३१/१२/२०१४ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि. ०१.०१.२०१५ ते दि.३१.१२.२०१५ च्या मध्यरात्रीपर्यंत एक वर्षाच्यां कालावधीसाठी राहील.

४) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** ची वार्षिक रक्कम कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी एकत्रित रु. ३ लाख इतकी आहे.

५) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** करिता खाली नमूद केल्यानुसार कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांचा समावेश असलेल्या अवलंबिताची माहिती खालील नमूद केलेल्या कुटुंबाच्या व्याख्येच्या अधीन राहून, M.D. India कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.mdindiaonline.com/maharashtraelectricity/selection.aspx यावर कर्मचाऱ्यांनी स्वत: Online भरावी. सदर माहिती Online भरताना कर्मचाऱ्यांनी Top Up Facility घ्यावयाची अथवा नाही याबाबतच्या विकल्पाची देखील निवड करणे गरजेचे आहे.

**कुटुंब म्हणजे :**

१) कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.

२) कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(तथापि, विमा कंपनीनुसार अवलंबित मुलांच्याबाबतीत खालील अटी लागू राहतील.

- १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
- तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
- मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.)
- कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.

३) कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई- वडील, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेले तिचे आई- वडीलांची किंवा सासुसासऱ्यांपैकी एकाची निवड करता येईल.

४) कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.

५) कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, त्यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.

६) या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

६) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** मध्ये प्रत्येक आजारांसाठी खर्चाची मर्यादा ठरविण्यात आलेली आहे. (**Diseasewise Capping** ) याबाबतची सविस्तर यादी कर्मचाऱ्यांना www.mdindiaonline.com/maharashtraelectricity/selection.aspx व www.mahadiscom.in या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

७) कर्मचाऱ्यास / अवलंबितास सद्या असलेल्या आजारांचा MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy मध्ये समावेश करण्यात आला आहे. (Pre-existing Diseases Covered)

८) MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy अंतर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ३० दिवसांत घ्यावयाच्या उपचाराचा समावेश असेल. (30 days Pre- Post hospitalization Covered)

९) MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy अंतर्गत कर्मचाऱ्यांना रु. तीन लाखापेक्षा जास्तीचा वैद्यकीय विमा वैयक्तिकपणे घ्यावयाचा असल्यास, कर्मचारी रु. ३ लाखावरील विमा रकमेचा हप्ता वैयक्तिकपणे भरु शकतील याचा पर्याय MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy मध्ये करुन देण्यात आला आहे. परंतु याकरिता तिन्ही कंपन्यांतील कमीत-कमी २५% कर्मचाऱ्यांनी संमती / सहभाग दर्शविणे आवश्यक आहे.( Top-up Facility available for employees but Additional Premium to be paid by employee subject to minimum 25% employees from all three companys should opt for this facility)

**फक्त कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी**

| Sum Insured (Rs.) | Premium per family including tax (Family size 1+5) | | Sum Insured (Rs.) | Premium per family including tax (Family size 1+5) |
|---|---|---|---|---|
| 1 Lac | *Rs. 2896/- | | 2 Lac | *Rs. 4672/- |
| 3 Lac | *Rs. 6073/- | | 4 Lac | *Rs. 7008/- |
| 5 Lac | *Rs. 7661/- | | - | - |

* उपरोक्त Top Up सुविधेचा विकल्प तिन्ही कंपन्यांतील एकूण कर्मचाऱ्यांपैकी २५ % कर्मचाऱ्यांनी निवडला असेल तरच सदर Top Up सुविधेचा लाभ कर्मचाऱ्यांना Sum Insured समोर दर्शविलेल्या रकमेत देण्यात येईल.

- जर २५ % पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी Top Up सुविधेचा विकल्प निवडल्यास कर्मचाऱ्यांच्या माहे जानेवारी २०१५ च्या वेतनातून सदर रक्कम कपात करण्यात येईल. यास्तव सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांची माहिती Online भरणे व त्याची Print स्वाक्षरीसह संबंधीत विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
- कर्मचाऱ्यांनी उपरोक्त माहितीची Save झालेली PDF File घ्यावी तसेच त्यांची Print ,घेवून Top Up Facility समोर दर्शविण्यात आलेली रक्कम माझ्या माहे जानेवारी २०१५ च्या वेतनातून कपात करण्यास माझी कुठलीही हरकत नाही, अशा हमीपत्राखाली कर्मचाऱ्यांनी स्वत:ची स्वाक्षरी करुन एक प्रत कर्मचारी काम करीत असलेल्या संबंधीत कार्यालयास (नियंत्रण अधिकाऱ्यांकडे) सादर करावी व त्याची एक प्रत स्वत: कडे ठेवावी.
- **कर्मचाऱ्यानी त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांची माहिती Online पध्दतीने www.mdindiaonline.com/maharashtraelectricity/selection.aspx यावर भरण्यासाठीची अंतिम मुदत दि. १२.०१.२०१५ रोजी रात्री १०:०० वाजेपर्यत राहील.**

१०) MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा लाभ कर्मचाऱ्यांस सेवा निवृत्तीनंतर देखील घेता येईल, परंतु याकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा हप्ता वैयक्तिकपणे भरावा लागेल. (After Retirement employee can get benefit of Group Mediclaim Insurance policy if he is ready to pay premium personaly)

| Sum Insured (Rs.) | Premium per family (Family size 1+1) | | Sum Insured (Rs.) | Premium per family (Family size 1+1) |
|---|---|---|---|---|
| 1 Lac | *Rs. 8000/- + S.T. | | 2 Lac | *Rs. 16000/-+ S.T. |
| 3 Lac | *Rs. 22000/-+ S.T. | | - | - |

* वैद्यकीय विमा सुविधेचा विकल्प तिन्ही कंपन्यांतील एकूण सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी २५ % कर्मचाऱ्यांनी निवडला असेल तरच वरील वैद्यकीय विमा सुविधेचा लाभ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना Sum Insured समोर दर्शविलेल्या रकमेत देण्यात येईल.

११) कर्मचाऱ्यास वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २० (क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. परंतु कर्मचाऱ्यांस रु. ३ लाखांपर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** द्वारेच घ्यावा लागेल.

१२) कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचाराकरिता **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** ची रक्कम रु. ३ लाख खर्च झाल्यास कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता रु. ३ लाखापर्यंतचा वैद्यकीय विमा लाभ एक विशेष बाब म्हणून वैद्यकीय उपचाराकरिता कंपनीमार्फत अथवा **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** मार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy करिता ओरिएंटल इन्शूरन्स कंपनीने M.D. India Health Care Services Pvt. Ltd. (T.P.A.) यांची नियुक्ती केलेली आहे. कर्मचाऱ्यांनी नोंदीत केलेल्या सर्व अवलंबितांसाठी व कर्मचाऱ्यासाठी MD India कंपनीमार्फत MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चे ओळख पत्रे व एक मार्गदर्शक पुस्तिका कर्मचारी काम करीत असलेल्या विभाग, मंडल, परिमंडल कार्यालयांकडे पाठविण्यात येईल. सांघिक कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची ओळख पत्रे औद्योगिक संबंध विभागाकडे पाठविण्यात येईल. सदर ओळख पत्र केवळ ओळख पटविण्यासाठी दिले जाणार असून मार्गदर्शक पुस्तीका कर्मचाऱ्यास कॅशलेस दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रिया समजण्यासाठी मदत करेल.

कर्मचाऱ्यांना M.D. India नेटवर्क रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. विना नेटवर्क रुग्णालयामध्ये कर्मचाऱ्यानी उपचार घेतल्यास M.D. India पॉलिसीच्या अटी आणि ,नियमांच्या अधीन राहून कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचाराची प्रतिपूर्ती करेल. कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची / चौकशीची गरज असल्यास कर्मचारी **M.D. India** Health Care Services Pvt. Ltd. (T.P.A.) यांच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी**

- **सर्व साधारण चौकशीकरिता - 1800 233 1166**
- **कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी - 1800 233 4505** **अथवा**
- **Email द्वारे -** msebmediclaim@mdindia.com **यावर संपर्क करु शकतात.**

याकरिता महावितरण कंपनी अंतर्गत परिमंडल स्तरावर कार्यरत असणारे सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी हे नोडल ऑफिसर म्हणून कर्मचाऱ्यांच्या वरील पॉलिसी संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता सहकार्य करतील. याकामी मंडल व विभागीय स्तरावरील व्यवस्थापक (मासं) व उपव्यवस्थापक (मासं), हे त्यांना मदत करतील. सांघिक कार्यालय स्तरावर वरीष्ठ व्यवस्थापक (मासं), व्यवस्थापक (मासं), औद्योगिक संबंध विभाग हे नोडल ऑफिसर म्हणून काम पाहतील. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सांघिक कार्यालय हे MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या विविध अडचणी सोडविण्यासंदर्भात **ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे व** M.D. India (T.P.A.), पुणे यांच्या अधिकाऱ्यांशी योग्य तो पाठपुरावा करुन निर्णय घेतील.

- **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** अंतर्गत **कर्मचाऱ्यांकरिता सवलतीच्या दरात वैद्यकीय तपासणी करण्याबाबतच्या सुविधा :**

१) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** अंतर्गत फक्त कर्मचाऱ्यांकरिता मोफत वैद्यकीय तपासणी शिबीराची सुविधा M.D. India Ltd (T.P.A.) मार्फत प्रमुख कार्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर मोफत वैद्यकीय तपासणी शिबीरामध्ये ज्या चाचण्या उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यांची यादी कंपनीच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

२) कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरामध्ये विशिष्ट आजारांशी संबंधीत वैद्यकीय तपासणी करण्यासाठीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून **याकरिता कर्मचाऱ्यांनी वैयक्तीकपणे वैद्यकीय तपासणीची रक्कम भरावयाची आहे.** विशिष्ट आजारांशी संबंधीत करावयाच्या वैद्यकीय तपासणी (Test) यादी कंपनीच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

३) इतर अत्याधुनिक विशिष्ट वैद्यकीय तपासणी कर्मचाऱ्यांना करावयाची असल्यास **त्याकरिता लागणारी रक्कम कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकपणे भरावयाची आहे.** यामध्ये कर्मचाऱ्यांस M.D. India Ltd (T.P.A.) मार्फत विशेष सवलत देण्यात येईल. अत्याधुनिक विशिष्ट वैद्यकीय तपासण्यांची व रुग्णालयांची यादी कंपनीच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

---

## कर्मचारी अपघात विमा योजना

ओरिएंटल इन्शूरन्स कंपनीमार्फत **फक्त कर्मचाऱ्यांकरिता "कर्मचारी अपघात विमा योजना"** सुरु करण्यात आली आहे. **कर्मचारी अपघात विमा योजनेची** ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१) कर्मचारी अपघात विमा योजनेचा पॉलिसीचा क्र. **१६१२००/४८/२०१५/४७९९** असा आहे.
२) कर्मचारी अपघात विमा योजनेचा हप्ता संपूर्णपणे कंपनीतर्फे भरण्यात आला आहे.
३) कर्मचारी अपघात विमा योजनेचा कालावधी दि. ३१/१२/२०१४ च्या मध्यरात्रीपासून म्हणेजच दि. ०१.०१.२०१५ ते दि.३१/१२/२०१५ च्या मध्यरात्रीपर्यंत एक वर्षाच्या कालावधीचा राहील.
४) कर्मचाऱ्यांच्या अपघात विमा योजनेची रक्कम प्रत्येकी रु. २ लाख इतकी राहील.
५) सेवानिवृत्ती, राजीनामा, बडतर्फी इ. कारणांमुळे कर्मचाऱ्यांची सेवा संपुष्टात आल्यास या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याला अपघात विमा योजनेचा लाभ घेता येणार नाही.
६) अपघात विमा योजने अंतर्गत कर्मचाऱ्याला खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देय राहील.

| | | |
|---|---|---|
| अ) कर्मचाऱ्यास मृत्यु झाल्यास | - | 100 टक्के |
| ब) कायमचे अपंगत्व आल्यास | - | 100 टक्के |
| क) दोन हात / दोन्ही डोळे / एक हात व एक डोळा गमावल्यास | - | 100 टक्के |
| ड) एक हात / एक डोळा गमावल्यास | - | 50 टक्के |
| इ) अपघाताने अंशत: कायमचे अपंगत्व आल्यास | - | अपंगत्वाच्या प्रमाणानुसार कर्मचाऱ्याला नुकसान भरपाई दिली जाईल. |
| ई) तात्पुरत्या स्वरुपाचे अपंगत्व आल्यास | - | साप्ताहिक वेतनाच्या 1 टक्के याप्रमाणे कमाल 100 आठवडे |

**पत्ता :** दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड
पुणे डिव्हिजनल ऑफिस-२ (१६१२००)
गंणात्रा चेंबर्स, ३ रा मजला,
५७१ सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड,
पुणे- ४११ ०३०.
**Email** :161200@orientalinsusrance.co.in
**दूरध्वनी क्रमांक** :-020-24451967 /24451566
**फॅक्स नं.** :- 020-24450809

कर्मचाऱ्याचा, सेवा कालावधीत अपघात झाल्यास कर्मचारी अपघात विमा योजना पॉलिसी अंतर्गत नुकसान भरपाई करिता दावा दाखल करण्यासाठी कर्मचाऱ्याला प्राणांतिक / अप्राणांतिक अपघात झाल्याची प्राथमिक माहिती / सुचनापत्र (Intimation Letter ) तातडीने ओरिएंटल इन्शूरन्स कंपनीकडे उपरोक्त दिलेल्या पत्त्यावर सादर करणे संबंधीत कार्यालयास बंधनकारक राहील, अन्यथा विमा कंपनीकडे कर्मचाऱ्याचा दावा ग्राह्य धरता येणार नाही. कर्मचारी (अप्राणांतिक अपघाताकरिता) अथवा त्यांच्या वारसांकडून (प्राणांतिक अपघाताकरिता) संपूर्ण कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर सोबत जोडलेला प्रपत्र -अ व सहपत्रांसह विमा कंपनीचा क्लेम फॉर्म (Personal Accident Policy Claim Form) योग्य त्या संपूर्ण कागदपत्रांच्या पूर्ततेसह विमा कंपनीकडे सादर करणे बंधनकारक आहे. कर्मचाऱ्यांचे अशा प्रकारचे दावे कार्यकारी अभियंता किंवा तत्सम दर्जाचे किंवा त्यापेक्षाही वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांचेकडे उपरोक्त पत्त्यावर सादर होणे आवश्यक आहे.

महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांचे अपघात विमा योजने अंतर्गत प्राप्त झालेले दावे त्या-त्या स्तरावर संबंधीत कार्यालयाने पूर्ण छाननी करुन विनाविलंब परस्पर विमा कंपनीकडे Email द्वारे - 161200@orientalinsurance.co.in यावर पाठवावे व त्याची एक प्रत **PA Claim-CPF no of employee हा विषय टाकून** माहितीसाठी या कार्यालयाचा ई - मेल jciro_ho@mahadiscom.in यावर पाठवावी. कर्मचाऱ्याचा प्राणांतिक / अप्राणांतिक अपघात झाल्याची प्राथमिक माहिती / सुचनापत्र (Intimation Letter) विमा कंपनीकडे कोणतीही सबब न सांगता 30 दिवसांच्या आत सादर करणे संबंधित कार्यालयावर बंधनकारक आहे. या विहित कालावधीमध्ये असे दावे विमा कंपनीकडे सादर न झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यास जबाबदार धरुन विमा कंपनीकडून मिळणारी नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांकडून वसूल केली जाईल, शिवाय त्यांच्याविरुध्द कार्यालयीन शिस्तभंगाची कडक कारवाई देखील केली जाईल.

**कर्मचाऱ्यास प्राणांतिक अपघात झाल्यास त्यांच्या वारसाकडून कर्मचाऱ्यांचा दावा दाखल करण्यासाठी खालील कागदपत्रे घेवून संबंधीत कार्यालयाने असे प्रपत्र विमा कंपनीस परस्पर पाठवावे.**

**(मृत्यु दावा दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे ) :**

१) दावा दाखल करण्यासाठी भरावयाचा विहीत नमुना अर्ज (विहीत नमुना अर्जाची संगणकीय प्रत (Soft Copy) स्वतंत्ररित्या पुरविण्यात येईल.)
२) मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.
३) मृत्यु होण्यापूर्वी ज्या दवाखान्यात किंवा ज्या वैद्यकीय तज्ञांकडे उपचार घेण्यात आले त्याचा वैद्यकीय अहवाल.
४) शवविच्छेदन अहवाल (सांक्षाकीत प्रत)
५) तपासणी अहवाल. (सांक्षाकीत प्रत)
६) अपघात अहवाल.
७) प्रथम खबर अहवाल, पोलीस पंचनामा / एम. एल. सी. (सांक्षाकीत प्रत)

८) रासायनिक प्रक्रिया अहवाल.(उपलब्ध असल्यास) आंतरांग तपासणी अहवाल (उपलब्ध असल्यास)
९) दवाखान्यातील उपलब्ध माहिती.
१०) कार्यालयीन हजेरीपटाची प्रत / हजेरीपट.
११) वर्तमान पत्रातील कात्रणे अथवा उपलब्ध असलेली इतर कागदपत्रे.
१२) वार्षिक उत्पन्न दर्शविणारा अद्यावत उत्पन्न कर दाखला. (I.T. Return)
१३) अनुक्रमण आदेश / कायदेशीर वारस प्रमाणपत्र / सदर विमा योजनेअंतर्गत नामनिर्देशन केले नसल्यास , कायदेशीर वारस सिध्द करण्यायोग्य कोणतीही कायदेशीर कागदपत्रे.
१४) कंपनीला आवश्यक वाटणारी इतर कागदपत्रे.

**कायमस्वरुपी अंशत: अथवा कायमस्वरुपी पूर्णत: अंगपत्व आल्यास दावा दाखल करण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे.**

१) दावा दाखल करण्यासाठी भरावयाचा विहीत नमुना अर्ज (विहीत नमुना अर्जाची संगणकीय प्रत (Soft Copy) स्वतंत्ररित्या पुरविण्यात येईल.)
२) जिल्हाशल्य चिकित्सक यांनी प्रदान केलेले अंपगत्वाचे प्रमाणपत्र.
३) अपघात अहवाल.
४) प्रथम खबर अहवाल, पोलीस पंचनामा / एम. एल. सी. (सांक्षाकीत प्रत)
५) दवाखान्यातील उपलब्ध माहिती.
६) कार्यालयीन हजेरीपटाची प्रत / हजेरीपट.
७) वर्तमान पत्रातील कात्रणे अथवा उपलब्ध असलेली इतर कागदपत्रे.
८) कंपनीला आवश्यक वाटणारी इतर कागदपत्रे.

---

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy व कर्मचारी अपघात गटविमा योजनेसंदर्भातील तरतूदींत आवश्यक वाटल्यास तो बदल करण्यासाठी किंवा सदर योजना पुढील कालवधीसाठी सुरु ठेवणे अथवा त्यामध्ये बदल करण्यासंदर्भात मा. व्यवस्थापकीय संचालक यांना संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनियम करुन घेण्याचे ,अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील "MSEBHCL Mediclaim" या शिर्षकाखाली उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारीत करण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सोईकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet – RAPDRP या संकेत स्थळावरील Industrial Relations Department यामध्ये व www.mdindiaonline.com/maharashtraelectricity/selection.aspx यावर देखील उपलब्ध आहे.

(डॉ. मुरहरी केळे)
कार्यकारी संचालक (मासं) (प्रभारी)

प्रति
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी महावितरण कंपनी मर्यादित.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.
२) संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.